Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर - 416004

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी /2026-27/ 4040 दिनांक : 26 / 10 / 2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हा

विषय : सन 2026 च्या दुष्काळामुळे बाधित तालुक्यातील विद्यार्थ्यांना फेब्रु/मार्च 2027 च्या परीक्षेकरिता परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.

संदर्भ : 1) शासन निर्णय क्र. एफईडी 1592 / 1202 / (1132) साशि-5, मुंबई 32 दिनांक 18.10.1993.
2) मदत व पुनर्वसन विभाग यांचा शासन निर्णय क्र.समिती 2026/प्र.क्र.82/मदत-2, दि.25.09.2026
3) राज्य मंडळाचे क्र.रा.मं./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी/26-27/4044, दि.29.09.2026 रोजीचे पत्र.
4) या कार्यालयाचे पत्र क्र. कोविमं/लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी /2026-27/3491, दि.01.10.2026
5) शासन पत्र क्र. संकीर्ण-2026 / प्र.क्र.61 / एसडी-5, दिनांक 05.10.2026.
6) मदत व पुनर्वसन विभाग यांचा शासन निर्णय क्र.समिती 2026/प्र.क्र.82/मदत-2, दि.14.10.2026
7) शासन पत्र क्र. संकीर्ण-2026 / प्र.क्र.61 / एसडी-5, दिनांक 23.10.2026
8) राज्य मंडळाचे क्र.रा.मं./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी/26-27/4550, दि.24.10.2026 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून व संदर्भिय शासन निर्णय क्र. 6 अन्वये राज्यातील 305 तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. सदर दुष्काळग्रस्त 305 तालुक्यामधील राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय झालेला आहे. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रु/मार्च 2027 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत (इ.10 वी) व उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षेचे परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून न घेता आवेदनपत्र भरून घेण्यात यावीत. सदर आवेदनपत्रे भरताना विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी माफी योजने अंतर्गत शासन निर्णय दिनांक 18.10.1993 मधील निकषांमध्ये केवळ या आर्थिक वर्षात एक विशेष बाब म्हणून शिथिलता देवून योजनेची व्याप्ती वाढविण्यात येत आहे.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील खरीप हंगाम 2026 - प्रथम कळ (Trigger-1) व दुसरी कळ (Trigger-2) लागू झालेल्या तालुक्यांची यादी खालील प्रमाणे -

महसूल विभाग	अ.क्र.	जिल्हा	प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके	
			तालुक्यांची नांव	तालुक्यांची संख्या
पुणे	1	सातारा	सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा, महाबळेश्वर, पाटण, जावळी, वाई, कोरेगांव, कराड	11
	2	सांगली	मिरज, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, शिराळा, वाळवा, विटा-खानापूर, तासगांव, कडेगांव पलूस	10
	3	कोल्हापूर	पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड, शाहुवाडी, शिरोळ	08
			एकूण	29

आवेदनपत्र भरत असताना परीक्षा शुल्क माफ करण्यासाठी दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांची फी माफीची कार्यवाही पुढील प्रमाणे करण्यात यावी.

1. दिनांक 14 ऑक्टोंबर, 2026 च्या शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या राज्यामध्ये दुष्काळग्रस्त भागामध्ये आपत्तीची परिस्थिती उद्भवलेल्या दुष्काळग्रस्त एकूण 305 तालुक्यातील मंडळाच्या माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी मार्च 2027 मधील परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांस परीक्षा फी माफीचा लाभ देण्यात येणार आहे.

(कृ.मा.प.)

2. दुष्काळग्रस्त तालुक्याव्यतिरिक्त इतर सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी विहित पध्दतीनुसार व विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.
3. सदर योजना शासकीय / खाजगी अनुदानित / विना अनुदानित, स्वयं अर्थसहाय्यीत माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू राहील.
4. जे विद्यार्थी त्याच परीक्षसे दुसऱ्यांदा बसले असतील (रिपीटर) अशा विद्यार्थ्यांना सुध्दा लागू राहील.
5. जे विद्यार्थी बहि:स्थ (एक्सटर्नल) म्हणून नोंदले असतील अशा विद्यार्थ्यांना सुध्दा लागू राहील.
6. शहरी भागात वास्तव्यास असलेले, परंतु दुष्काळग्रस्त तालुक्यातील शेतजमीन असणाऱ्या पालकांचे विद्यार्थी पाल्य यांना सुध्दा लागू राहील.
7. शिक्षणासाठी अन्य ठिकाणी / शहरात वास्तव्यास असलेले, परंतु मूळ गाव दुष्काळग्रस्त तालुक्यात असलेले विद्यार्थी यांना सुध्दा लागू राहील.
8. संबंधित परीक्षार्थी दुष्काळग्रस्त तालुक्यातील असल्याबाबत रहिवासी दाखला अथवा सातबारा उतारा शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर मुख्याध्यापक / प्राचार्यांनी जतन करून ठेवावा.
9. दुष्काळग्रस्त / टंचाईग्रस्त भागातील इ.10 वी व इ.12 वी च्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सुध्दा परीक्षा शुल्क न घेता भरून घेण्यात यावीत. त्यांचे परीक्षा शुल्क हे शासनाच्या संबंधित विभागाकडून एकत्रित प्रस्ताव पाठवून राज्यमंडळा मार्फत घेण्यात येणार आहे.
10. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये आवेदनपत्र भरून घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी.
11. **मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी आवेदनपत्र भरून घेण्याची कार्यवाही 7 दिवसात करावी. दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी Institute Login मध्ये Application = Drought Entry / दुष्काळग्रस्त नोंद या Option मध्ये माहिती भरावी.**
12. दुष्काळग्रस्त भागातील सवलतीस पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरणा केली असेल अशा विद्यार्थ्यांचा शुल्क परतावा रक्कम विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न Bank Accout मध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न बँक खात्याची माहिती उपलब्ध न झाल्यास अथवा चुकीची माहिती अथवा चुकीचा आधार क्रमांक दिल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घेण्यात यावी, ही जबाबदारी पूर्णत: संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.
13. **ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी जमा करून घेतेलेले आहेत, तथापि मंडळाकडे भरणा केलेला नाही, असे जमा केलेले शुल्क त्यांचे स्तरावर विद्यार्थ्यांना तात्काळ परत करावे. ही जबाबदारी पूर्णत: संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.**

उपरोक्त प्रमाणे निकषांची व अन्य आवश्यक बाबींची संदर्भिय शासन निर्णयानुसार खात्री करून घेण्यात यावी व त्यानुसार सदरील योजनेची अंमलबजावणीसाठी विहित मुदतीत विद्यार्थ्याचे आवेदनपत्रे भरून घेण्यात यावीत. कोणताही विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(मा.विभागीय अध्यक्ष यांच्या मान्यतेने)

(गजानन तानाजी उकिर्डे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव :

1. निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती, सातारा / सांगली / कोल्हापूर
2. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :

1. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
   यांना कळविण्यात येते की, सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये आवेदन पत्रे भरून घेण्याबाबत पाठपुरावा करावा.
2. शिक्षणाधिकारी (माध्य), सातारा / सांगली / कोल्हापूर
   यांना कळविण्यात येते की, सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी **दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांची** विहित कालावधीमध्ये आवेदन पत्रे भरून घेण्याबाबत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून पाठपुरावा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.